# वसंत देसाई - भाग ३



'जीवन यात्रा', 'सुभद्रा' आणि 'मंदिर' यांसारख्या त्यांच्या सुरुवातीच्या चित्रपटांत संगीत दिग्दर्शक म्हणून त्यांना फारसे यश लाभले नाही. (आठवले म्हणून सांगतो, की या सर्व चित्रपटांतून लता मंगेशकर यांनी छोटी मोठी कामे केली होती.) 'हिंदुस्थान हमारा', 'शीश महल', 'हैद्राबादकी नाझनीन' ('निगाहे लडते ही दिलका मचलना'/शमशाद) यांसारख्या आणखीही चित्रपटांनी त्यांना यश दिले नाही. परंतु १९५५च्या 'झाक झनक पायल बाजे' (अडाणा रागातील आमीर खान यांनी गायलेले गाणे), 'सैया जाओ' (लता - राग देश), 'नैन से नैन नाही मिलाओ' (लता आणि हेमंत - राग मालगुंजी), 'मेरे ऐ दिल बता' (लता राग भैरवी) ही ह्या चित्रपटातील खूप गाजलेली गीते ! नायिकेच्या असहाय्य भावनेतून आर्जव करणारे 'क्या करू? क्या करू?' हे शब्द किती सुंदर रितीने गुंफले आहेत. 'क्रिश्ना - जो तुम तोडो पिया' हे लताने भैरवी रागातून गायलेले लयदार भजन मनाला भावून जाते. त्यांच्या गाण्यांची चाल सोपी, सरळ आणि साधी असते. आर्केस्ट्रेशनच्या कठीण हरकतीपेक्षा शास्त्रीय संगीतावर सहज सुंदरतेने बांधलेल्या चाली रसिकांच्या मनात कायम जागा निर्माण करतात.

त्यानंतरच्या वर्षी 'तूफान और दिया' प्रदर्शित झाला. त्यामधील मालकंस रागातील मन्ना डे आणि कोरस यांनी म्हटलेले 'निर्बलसे लडाई बलवानकी' आणि लताने आसावरी रागात गायलेले 'पिया ते कहाँ' ह्या गाण्यांना उदंड यश मिळाले. १९५७ साली 'दो आँखे बारह हाथ' हा नितांतसुंदर चित्रपट प्रदर्शित झाला. लता, व्ही. शांताराम आणि कोरस यांचे 'ऐ मालिक तेरे बंदे हम', लताचे 'सैंय्या झूटोंका बडा सरताज निकला', लता आणि मन्ना डे यांचे 'उमड उमड कर आयी रे घटा' आणि लताने म्हटलेले 'मै गाऊँ तू चूप हो जा' हे लडिवाळ स्वरांतील अंगाई गीत, सारीच गाणी रसिकांनी उचलून धरली. ह्या अंगाई गीतासाठी संगीतकाराने सगळी वाद्ये लयबध्दता साधण्यासाठी साधणारी हळूवार आवाजात वापरली. विशेषत: 'त्रिकोण' ह्या वाद्याचा खास उपयोग केला.

या भव्य चित्रपटानंतर वसंत देसाई यांनी आणखीही बरीच गाणी दिग्दर्शित केली. परंतु ’गूँज उठी शहनाई’नंतर फार तर २-४ गाणीच विशेष गाजली. ’आई परी रंग भरी’ (आशा आणि कोरस - ’दो फूल’), ’टिम टिम टिम तारोंके दीप जले’ (तलत आणि लता - ’मौसी’), ’तेरा खत लेके सनम’ (लता - ’अर्धांगिनी’), ’मुखडा देख प्रानी’ (प्रदीप - ’दो बहने’) अशी थोडीफार गाणी रसिकांच्या पसंतीस उतरली.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com